# लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये श्रेष्ठ समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जन्मोत्सवानिमित्त व्याख्यानमालेचे आयोजन





श्रेष्ठ समाजसुधारक तसेच श्रमजीवी वर्गाच्या शोषणाची दास्याची मीमांसा करणारे क्रांतिकारक विचारवंत जोतिराव गोविंदराव फुले ऊर्फ महात्मा फुले यांचा जन्मदिवस  लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान वडाळा यांच्यावतीने माननीय रोहिणी चौगुले मॅडम यांची व्यासपीठावर उपस्थिती होती तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष पद माननीय प्राचार्य श्री योगेश गायकवाड सर यांनी भूषवले, याचबरोबर व्यासपीठावर निदेशक माननीय संध्याराणी शिंदे मॅडम, अरुणा कोरे मॅडम, प्रमुख वक्ते म्हणून माननीय श्री बाळासाहेब जाधव सर यांची व्यासपीठावर उपस्थिती होती, महात्मा फुले यांच्या प्रतिमेची पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष माननीय प्राचार्य गायकवाड सर यांनी अतिथींची ओळख करून दिली तसेच आंब्याचे रोपटे आणि त्यासोबत वृक्ष संवर्धनाची जबाबदारी देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

या मंगल प्रसंगी माननीय प्राचार्य सरांनी आपले मनोगत व्यक्त करताना महात्मा ज्योतिबा फुले यांच्या संघर्षमय जीवनावर प्रकाश टाकताना त्यांनी आपले विचार मांडले 'बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले...' ही उक्ती सार्थ करणारे महात्मा फुले हे भारतीय इतिहासातले आद्य समाज क्रांतिकारक. आपले विचार प्रत्यक्ष आचरणात आणणारे ते बंडखोर युगपुरुष होते. आपली वैचारिक मांडणी, कृतीतून त्यांनी अनेक आघाड्यांवर लढा दिला. जाती प्रथा, ब्राह्मणी धर्माचे वर्चस्व, स्त्रियांचे शोषण, शेतकरी-कष्टकरी यांची पिळवणूक, सांस्कृतिक गुलामगिरी या सर्व आघाड्यांवर संघर्ष केला. त्यांचा हा संघर्ष सत्यशोधनावर आधारलेला होता.

दरम्यान  माननीय श्री बाळासाहेब जाधव सर यांच्या व्याख्यानाने लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे व्यासपीठ मंत्रमुग्ध झाले होते. आपल्या विचारातून महात्मा फुले यांचा गौरव करताना जाधव सर म्हणाले , हिंदू समाजातल्या बहुजन समाजात आत्मप्रत्यय आणि आत्मावलोकन उत्पन्न करणारा पहिला माणूस म्हणजे ज्योतिबा फुले होय. शतकानुशतके अज्ञानाने, दारिद्र्याने व हीन संस्कृतीने ग्रासलेल्या हिंदू समाजातल्या जनतेला आत्मपरीक्षण करण्याचा पहिला आदेश ज्योतिबांमुळे मिळाला', अशा शद्बांत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी ज्योतिबांचा गौरव केला आहे. ज्योतिबांचे ध्येय होते 'एकमय लोक' आणि त्यांना समाजाचे नेमके दुखणे काय आहे याची जाण होती. म्हणूनच शोषित, पराभूत समाजाचा पर्यायी इतिहास लिहू पाहणारे फुले आपल्या इतिहासातली एक महत्वाची क्रांतिकारी शक्ती होती हे विसरता कामा नये. स्त्रिया, दलित, कष्टकरी आणि शेतकरी यांचे होत असलेले शोषण सर्वात प्रथम फुलेंना जाणवले. ज्योतिबांनी १८४८ मध्ये मुलींसाठी पहिली शाळा पुण्यात सुरू केली. बहुजन समाजाला, अस्पृश्यांना आणि त्यातही प्रामुख्याने स्त्रियांना शिक्षण द्यावे असा आग्रह त्यांनी केला. ऐतिहासिकदृष्ट्या ही घटना अत्यंत महत्वाची होती. आज शतकानंतरही तळागाळातील स्त्रियांचे जगणे अपार कष्ट सोसण्यातच जाते.

भारतीय समाजरचना बहुपेडी आणि विषम आहे. या शोषित-पीडित-वंचित समाजाला आहे तेथेच ठेवून फक्त कल्याणकारी सुधारणांच्या नावाखाली वरवरच्या उपाययोजना करून प्रश्न सोडवणे ज्योतिबांना मान्य नव्हते. ब्राह्मणी धर्माची, प्राचीन पोथ्या, पुराणांची, जुन्या धर्मग्रंथांची आणि त्यातून उदयास आलेल्या सामजिक मूल्यांची ज्योतिबांनी परखड चिकित्सा केली. त्यांनी सार्वजनिक सत्यधर्माची नवीन संकल्पना मांडली. अंधश्रद्धा, चमत्कार यांच्यावर ताशेरे ओढले. सत्य आणि विवेक या नवमूल्यांचे रोपण केले. महाराष्ट्राचा इतिहास सांगणारा पोवाडा रचला. यातून शिवाजी महाराजांना 'कुळवाडी भूषण' म्हणून शेतकरी समाजाचा हितचिंतक आणि संरक्षक या रुपात पुढे आणले.

ज्योतिबा फुलेंच्या पुण्यातल्या शाळेत शिकणाऱ्या एका ११ वर्षाच्या मुलीने लिहिलेला निबंध महत्वाचा आहे. ही मुलगी मातंग समाजाची होती. यात विचारलेले प्रश्न मूलगामी होते. तिच्या या मांडणीचे श्रेय जोतिबांना जाते. 'सार्वजनिक सत्यधर्म' या पुस्तकातला 'स्त्री आणि पुरुष' हा संवाद त्यांची विचारधारा सांगणारा आहे. या पुस्तकात उच्च-नीच उतरंडीचा विरोध करणारी, श्रमिकांना सन्मान देणारी, लोकशाहीपूरक आणि शोषण विरोधी मूल्ये आपल्या विशिष्ट शैलीत मांडली आहेत. स्त्रियांचा विशेषत्वाने केलेला उल्लेख हे या मांडणीचे अजून एक वैशिष्ट! स्त्री-पुरुष समानतेचे महत्व आग्रहाने मांडले आहे. 'आज आपल्याकडे मतदानाचा हक्क न झगडताच मिळाला पण त्याने आमच्या समाजव्यवस्थेला धक्कासुद्धा पोहचत नाही. मुकेपणाने सोसणाऱ्या स्त्रियांच्या हाती घराचा, समाजाचा आणि राज्याचा कारभार द्यायचा झाला तर त्यांना आपल्याला काय हवे, काय नको हे बोलण्याचे बळ आणि निर्भयता हवी. हे निर्माण करण्याचा पहिला प्रयत्न ज्योतिबांनी केला हे त्यांचे फार मोठे श्रेय आहे,' असे मत ज्येष्ठ स्त्रीवादी विचारवंत विद्युत भागवत यांनी व्यक्त केले आहे.

ज्योतिबांनी बालविवाह, सती प्रथा, जरठ कुमारिका या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. फुल्यांच्या समकालीनांमध्ये आगरकरांनी स्त्री-पुरुष समानतेचा विचार बंडखोर प्रवृत्तीने मांडला. लोकहितवादी अर्थात गोपाळ हरी देशमुख हे केवळ बोलके सुधारक असल्याचे त्यांच्या कृतीतून सिद्ध झाले आहे. न्या. रानडे यांनी आयुष्यभर विधवा पुनर्विवाहाचे समर्थन केले. पण ते विधूर झाल्यावर मात्र त्यांनी विधवेशी विवाह न करता कुमारिकेशी केला. न्या. रानडे यांचे पट्टशिष्य ना. गोखले. यांनी तर पहिली बायको जिवंत असताना दुसरे लग्न केले. रानडे यांचे अग्रणी न्या. तेलंग यांनी आपल्या मुलीचा विवाह भरपूर हुंडा देवून आठव्या वर्षीच केला. या पार्श्वभूमीवर फुल्यांचे वेगळेपण उठून दिसते. अपत्य होत नाही म्हणून त्यांनी दुसरा विवाह केला नाही. तसेच विधवा ब्राह्मण काशीबाईच्या मुलाला, यशवंत यास दत्तक घेऊन एक वेगळा आदर्श घालून दिला. सावित्रीबाई, फातिमा बी, मुक्ता साळवे, ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई, आनंदीबाई जोशी यांच्या कार्यामागची प्रेरणा फुलेच आहेत. खरोखरच महात्मा जोतिबा फुले हे भारतीय स्त्रीमुक्ती चळवळीचे आद्य प्रणेते ठरतात.

कार्यक्रमामध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील, विविध व्यवसायामध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या १०० प्रशिक्षणार्थ्यांची उपस्थिती होती, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तसेच आभार प्रदर्शन माननीय श्री संभाजी जाधव सर यांनी केले, तसेच महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे रेखाटन श्री सौरभ दहीटनकर सर यांनी केले, कार्यक्रम व्यवस्थापन तसेच कार्यक्रम संपन्नतेसाठी श्री रमेश लवटे सर, श्री आकाश राठोड सर आणि श्री राहुल गवळी सर यांनी विशेष योगदान दिले.